रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ५६
www.ramprahar.com

गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पुणे जिल्ह्यातील पाणी योजनांना गती देणार-उपमुख्यमंत्री पवार/२

पनवेल विकास आराखड्यावर सहा हजार हरकती-सूचना/६

समाजाभिमुख कामे करण्याची भूमिका -खासदार तटकरे/७

## आज होणार गौरी-गणपतींचे विसर्जन



**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात गौरीगणपतींचे गुरुवारी (दि.१२) विसर्जन केले जाणार आहे. विसर्जन शांततेत आणि सुरळीतपणे पार पडावे यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. जिल्ह्यात ७९ सार्वजनिक तर ५४ हजार ९२३ घरगुती गणपतींचे तर १५ हजार ८३२ गौरींचे विसर्जन करण्यात येणार आहे. अलिबाग, उरण, मांडवा, आक्षी, मुरूड, श्रीवर्धन आणि रेवदंडा येथील समुद्रकिनाऱ्यावर गणेश विसर्जन करण्यात येणार आहे, तर इतर ठिकाणी नदी आणि तलावामध्ये गौरी गणपतींचे विसर्जन करण्यात केले जाणार आहे. ठिकठिकाणी कृत्रिम तलावही तयार करण्यात आले असून निर्माल्याचा कचरा होऊ नये यासाठी निर्माल्य कलश विसर्जन ठिकाणी ठेवण्यात आले आहेत. काही ठिकाणी वाहतुकीत बदल करण्यात आले असून पोलीस पथकही तैनात असणार आहे.

# भाजप कधीही आरक्षण संपू देणार नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राहुल गांधींना प्रतिटोला

**नागपूर : प्रतिनिधी**

लोकसभा विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे खासदार राहुल गांधी सध्या अमेरिका दौऱ्यावर आहेत. यादरम्यान राहुल गांधींनी केलेल्या आरक्षणाच्या वक्तव्यावरुन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. भाजप कधीच आरक्षण संपू देणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या एक्स आकऊंटवर लिहिले, राहुल गांधी आणि काँग्रेसचा खरा चेहरा यानिमित्ताने परत एकदा समोर आला आहे. राहुल गांधी आरक्षण संपवण्यासंदर्भात विदेशात एक वक्तव्य केले आहे. एका बाजूला निवडणुकीत खोटे नरेटिव्ह पसरवायचे आणि दुसऱ्या बाजूला परदेशात जाऊन आरक्षण संपवण्याची भाषा करायची, हे दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा काँग्रेसने कधीच सन्मान केला नाही.

मतांसाठी ते खोटे नरेटिव्ह तयार करतात, हे राहुल गांधी यांच्या वक्तव्याने स्पष्ट झाले आहे. किंबहुना भाजपची भूमिका स्पष्ट आहे. भाजप आरक्षणाच्या बाजूने असून कधीही आरक्षण संपू देणार नाही, असे मत व्यक्त केले. राहुल गांधींनी कितीही प्रयत्न केला तरी देशातील प्रत्येक वर्गाला त्यांचे हक्क मिळण्यापासून रोखू शकत नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री फडणवीसांनी राहुल गांधींवर निशाणा साधला.

### ■ काँग्रेसचा खरा चेहरा उघड -मुख्यमंत्री

विदेशात जाऊन सातत्याने भारताची, येथील नागरिकांची बदनामी करण्याचा उद्योग विरोधी पक्षनेते राहुल गांधी करतात. परदेशात जाऊन मनाला येईल ते बरळणे, आरोप करणे लोकप्रतिनिधीला शोभत नाही, मात्र त्यांनी काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा उघड केला. महायुती आरक्षणाच्या बाजूने आहे. आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही हाणून पाडू. राहुल गांधी हे परकीय मानसिकतेलाच धार्जिणे आहेत, हे यानिमित्ताने सिद्ध होते, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.



**अलिबाग : आदर्श मित्र मंडळाचा गणराज आणि स्त्री अत्याचारांसंदर्भातील देखावा.**

## आयसीसी महिला टी-२० विश्वचषक दौरा जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ची स्पर्धा ३ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. ही संपूर्ण स्पर्धा यूएईमध्ये खेळवली जाईल. भारतीय महिला संघाचा पहिला सामना न्यूझीलंड विरुद्ध रंगणार आहे.

ही संपूर्ण स्पर्धा यूएईमध्ये खेळवली जाणार आहे. हा सामना दुबईत ४ ऑक्टोबरला होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना ६ ऑक्टोबरला होणार आहे. सेमीफायनलपूर्वी टीम इंडियाला एकूण ४ सामने खेळायचे आहेत. भारतीय संघ दुबईत तीन आणि शारजाहमध्ये एक सामना खेळणार आहे.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्या गव्हाण येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. सोबत इतर मान्यवरही उपस्थित होते.**

## 'शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राज्यातील मंत्र्यांचे शिष्टमंडळ केंद्रीय मंत्र्यांची भेट घेणार'

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी, शेतमजूरांच्या प्रश्नांसदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.११) मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत केंद्रीय मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.



शेतमालाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे ही सरकारची भूमिका असून सोयाबीन आणि कापसाचा हमीभाव वाढवण्यासाठी, तसेच निर्यातीस परवानगी देण्यासाठी केंद्र सरकारने अनुकुलता दर्शविली आहे. याबाबत लवकरच शिष्टमंडळ केंद्रीय मंत्र्यांची भेट घेणार आहे.

ऊसाचा एमएसपी वाढवून देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कठोर भूमिका घेतली असून त्याचे परिणाम लवकरच दिसतील. राज्यात ११ हजार ५०० मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दीष्ट असल्याने कृषीपंपांना दिवसा वीज मिळेल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. **(पान २ वर..)**

## जम्मूतील कठुआमध्ये तीन दहशतवादी ठार

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमध्ये भारतीय सुरक्षा दलांनी पुन्हा दहशतवाद्यांविरुद्ध मोहीम सुरू केली आहे. जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यातील कठुआ येथे बुधवारी (दि.११) सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले आहेत.

सुरक्षा दलांकडून अजूनही दहशतवाद्यांविरोधात शोधमोहीम सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीर निवडणुकीपूर्वी खोऱ्यात सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली आहे. कठुआ-उधमपूर सीमेवर लष्कराच्या पथकाने दोन तर बसंतगडमध्ये एकाचा खात्मा करण्यात आला.

## निवडक

### महामार्ग, द्रुतगती मार्गांवर २० किमीपर्यंत टोल माफ

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने जीपीएस सिस्टिम असलेल्या खासगी वाहनांना २० किमीपर्यंतच्या टोलमधून सूट दिली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम २०२४नुसार हा नियम लागू केला आहे. त्यानुसार केंद्र सरकारने जीपीएस आधारित टोल प्रणालीला मान्यता दिली आहे. ज्या वाहनांमध्ये जीपीएस प्रणाली असेल त्यांना टोल नाक्यांवर थांबावे लागणार नाही, तसेच फास्टॅगही भासणार नाही.

### पुरामुळे महाराष्ट्र व मध्य प्रदेश राज्याचा संपर्क तुटला

**भंडारा** : जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली. यात महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांना जोडणारा बपेरा पुलावर ३ ते ४ फूट पाणी असल्यामुळे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांचा संपर्क तुटला आहे. पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## जेएनपीए बंदरात मालाची अदलाबदल करून तस्करी

### १० कोटींचे ९.६ टन रक्तचंदन जप्त

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

वेस्टर्न कमोडच्या बनावट नावाखाली जेएनपीए बंदरातून शारजात पाठविण्याच्या तयारीत असलेल्या एका कंटेनरमधून १० कोटींचे ९.६ टन रक्तचंदन जप्त करण्यात आले आहे.

याप्रकरणी न्हावा शेवा सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोघांना अटक केली आहे. न्यायालयाने दोन्ही संशयित आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

जेएनपीएच्या सेझमधील सुरेश्वर सीएफएसमध्ये वेस्टर्न कमोड नावाने एक कंटेनर मालाची निर्यात करण्यासाठी आला होता. हा कंटेनर माल शारजा येथील एका कंपनीत पाठविण्यात येणार होता. निर्यातीसाठी आलेल्या कंटेनरमधील मालाची न्हावा शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबीच्या अधिकाऱ्यांनी कसून तपासणी केली होती. त्यानंतर सीमा शुल्क विभागाने तपासणी करून निर्यातीसाठी परवानगी दिलेला कंटेनर जेएनपीए अंतर्गत असलेल्या भारत मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी) बंदराकडे रवाना झाला.

अर्ध्या तासाच्या वाहतुकीदरम्यान सीमा शुल्क विभागाने तपासणी करून परवानगी दिलेला वेस्टर्न कमोड मालाचा सीलबंद कंटेनरची संघटीत आंतरराष्ट्रीय माफियांच्या टोळीने अदलाबदली केली. **(पान २ वर..)**




## आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी विधानसभा निवडणूक २०२४च्या निवडणूक कालावधीमध्ये कामकाज करण्यासाठी जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी व सहाय्यक नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व नोडल व सहाय्यक नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली.

या वेळी आगामी विधानसभा निवडणूक २०२४च्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व पूर्वतयारीच्या कामांना गती द्यावी, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सर्व बाबींची पूर्तता करावी, निर्धारित कामे वेळेत पूर्ण करून सोपवलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिल्या. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांसह २३ समित्यांचे अधिकारी उपस्थित होते.



### नोडल अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना

यामध्ये मुख्य नियंत्रण कक्ष, वाहतूक व्यवस्थापन, आदर्श आचार संहिता, बॅलेट पेपर आणि पोस्टल बॅलेट पेपर व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, प्रसार माध्यम आणि संदेशवहन, निवडणूक निरीक्षक, प्रशिक्षण आणि जनजागृती, मतदान केंद्र, मतदान केंद्रावरील मूलभूत सुविधा, दिव्यांग मतदार, स्वीप मोहीम, निवडणुकीविषयक कामकाजासाठी नोडल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी, मतदान कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीचे जास्तीत जास्त प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश त्यांनी दिले. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याची खात्री करा. शांततापूर्ण निवडणुकांसाठी सुरक्षायोजना तयार करा. पोस्टल मतदानासाठी पात्र व्यक्तींना पोस्टल मतदानाबाबतची माहिती मुदतीत देण्यात यावी. **(पान २ वर..)**

# पुणे जिल्ह्यातील पाणी योजनांना गती देणार -उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील घेरा, सिंहगड आणि प्रयागधाम, आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक, बारामती तालुक्यातील नीरावागज, खांडज, घाडगेवाडी तसेच इंदापूर तालुक्यातील बोरी या गावातील पाणी योजनांना गती देणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.



योजनांना गती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या गावांना भेट द्यावी. भौगोलिक परिस्थिती आणि शाश्वत जलस्त्रोतांचा अभ्यास करून सर्वोत्तम व्यवहार्य पर्याय सुचवावा. या गावांची पुढील ५० वर्षांची गरज लक्षात घेऊन पाणीयोजनांचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने पाठवावा. या योजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, प्रधान सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे आणि दूरदृश्यप्रणालीद्वारे पुणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, नवीन प्रस्ताव तयार करताना धरणातून बंद पाईपद्वारे पाणी आणणे किंवा नवीन साठवणतलाव बांधणे यासारख्या पर्यायांचाही विचार करावा. सध्याच्या अस्तित्वातील साठवण तलावाची दुरुस्ती, अशुद्ध पाणी गुरुत्वनलिका, अशुद्ध पाणी उद्धरणनलिका, पंपिंग मशिनरी, जलशुद्धीकरण केंद्र, अस्तित्वातील जल शुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती, शुद्ध पाणी ऊर्ध्वनलिका, उंच जलकुंभ, संतुलनटाकी, वितरण व्यवस्था, सौरऊर्जे सारख्या अपारंपरिक स्त्रोतांचा वापर, तसेच इतर अनुषंगिक कामांचा नव्या योजनेत समावेश करून, अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा. या प्रस्तावाचा शासनस्तरावर अभ्यास करुन त्यास तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. जिल्ह्यातील गावांच्या पाणीयोजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

### *बारामतीत साठवण तलावास मंजुरी*

***बारामती तालुक्यातील मौजे कांबळेश्वर येथील मातीच्या साठवण तलावातून कांबळेश्वर-शिरवली-शिरष्णे-लाटे-माळेवाडी या पाच गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. या साठवण तलावाचे बांधकाम जीर्ण झाले असल्याने मोठ्या प्रमाणावर गळती होते. या साठवण तलावाचे बांधकाम नव्याने आणि पक्क्या स्वरूपात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.***

### *अहमदनगरमधील नळयोजनांना सुधारीत मान्यता*

***अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातील मौजे भावडी आणि टाकळी लोणार या दोन गावांतील, अकोले तालुक्यातील मौजे माळेगाव आणि कर्जत तालुक्यातील शिंपोरा या गावातील जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णयही घेण्यात आला.***

## अल्पवयीन तरुणीवर अत्याचार

**नवी मुंबई : बातमीदार**



पुण्यातील बाणेर भागात राहणाऱ्या एका २२ वर्षीय तरुणाने त्याच भागात राहणाऱ्या एका १७ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर तरुणी गरोदर राहिल्याने तिच्या आईने तिला गर्भपातासाठी नवी मुंबईत नेरूळ येथील महापालिकेच्या रुग्णालयात आणल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

नेरूळ पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पीडित तरुणीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आकाश चव्हाण (वय २२) याच्याविरुद्ध बलात्कारासह पोक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करून सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी पुण्यातील म्हाळुंगे पोलिसांकडे वर्ग केला आहे.

या घटनेतील पीडित तरुणी ही पुण्यात आईवडिलांसह राहण्यास असून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी आकाश चव्हाण देखील त्याच भागात राहण्यास आहे. आरोपी आकाश चव्हाणने पीडित तरुणीसोबत ओळख वाढवून तिच्यासोबत मैत्री केली. पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यामुळे पीडित तरुणी गरोदर राहिल्यानंतर याबाबत आपली मुलगी गरोदर राहिल्याची बाब इतरांना समजल्यास बदनामी होईल, या भीतीने पीडित मुलीच्या आईने आपल्या मुलीचा गर्भपात करण्यासाठी गत रविवारी पुणे येथून नेरूळ गाठले. त्यानंतर आईने पीडित मुलीला नेरूळ येथील महापालिकेच्या मीनाताई ठाकरे रुग्णालयात दाखल केले.

डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत पीडित तरुणी चार महिन्यांची गरोदर असल्याचे आढळून आले. याबाबतची माहिती नेरूळ पोलिसांना दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. चव्हाण याच्याविरोधात बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच हा गुन्हा पुढील तपासासाठी म्हाळुंगे पोलिसांकडे वर्ग केला आहे.

## सीवुड्सच्या मॉलमध्ये भव्य ओणम सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

यंदा विकएंडला म्हणजेच १४ आणि १५ सप्टेंबर २०२४ रोजी ओणमचा उत्साहपूर्ण सण साजरा होणार आहे. नेक्सस सीवूड्स मॉल येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मल्याळी समाजाच्या सहकार्याने, मॉलमध्ये 'ओणम ओप्युलेन्स २०२४' चे आयोजन केले जात आहे.



या वेळी नागरिकांना २५० किलो रंगीबेरंगी फुलांपासून तयार केलेल्या ६४ चौरस मीटरच्या पुक्कळम (ओनमच्या मध्यभागी असलेली पारंपरिक फुलांची व्यवस्था)चे चित्तवेधक सौंदर्य पाहता येणार आहे. फुलांच्या सजावटीबरोबरच, पाहुण्यांना पारंपरिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्याची संधीदेखील मिळेल. ज्यात थेय्यम नृत्य सादरीकरणाचा समावेश आहे. नवी मुंबईसाठी हा अनुभव नवीनच असेल. इथे भेट देणारे अतिथी आणि अभ्यागतांसाठी ही एक दृश्य मेजवानी ठरेल.

थेय्यम नृत्य हा केरळमधील उत्तर मलबारमधील एक धार्मिक कला प्रकार आहे. जो वैविध्यपूर्ण वेशभूषा आणि तीव्र भक्तीसाठी ओळखला जातो. नवी मुंबईत पहिल्यांदाच संपन्न होणारी ही सादरीकरणे पाहण्यासारखी असतील, हे ठळक वैशिष्ट्य! सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात पारंपरिक 'चेंडा मेलम' ने होईल. त्यानंतर राजा मावेली यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक निघेल. थिरुवथिरकली, मोहिनीअट्टम आणि भव्य कथकलीसह विविध नृत्य सादरीकरणे होतील. दिवसाची सांगता सर्व सादरीकरणाच्या मिश्रणाने होईल.

पौराणिक कथा आणि कृषी पद्धतींमध्ये खोलवर रुजलेला ओनम हा सण समृद्धी, एकता आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. ओनम ओप्युलेन्स २०२४ चे आयोजन करून, नेक्सस सीवूड्स मॉलचे उद्दीष्ट केरळच्या समृद्ध परंपरांना नवी मुंबईच्या वैविध्यपूर्ण समुदायात आणणे, समाजातील सर्व घटकांमध्ये सर्वसमावेशकता आणि उत्सवाची भावना वाढवणे हे आहे. हा कार्यक्रम केवळ ओणमच्या वारशाचा सन्मान करत नाही तर नवी मुंबईला अद्वितीय बनविणारी चैतन्यमय सांस्कृतिक चित्रफीतदेखील दाखवतो.

## श्री साई ट्रस्टकडून शेवंता कराळे यांना व्हील चेअरची मदत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या श्री साई ट्रस्ट कडून बेकरे गावातील शेवंता किसन कराळे यांना व्हील चेअर मदत म्हणून देण्यात आली.

बेकरे गावातील शेवंता कराळे यांना पायात व्यंग आले आहे. त्यामुळे त्यांना चालता येत नसल्याने त्यांना नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून व्हील चेअरची मदत व्हावी. अशी विनंती माणगाव ग्रामपंचायत मधील माजी सदस्य जयेंद्र कराळे यांनी श्री साई ट्रस्टचे संचालक राधिका घुले यांच्याकडे केली होती. त्यानुसार नवी मुंबई येथील मुख्य कार्यालयात परवानगी दिल्यानंतर बेकरे गावी जावून शेवंता किसन कराळे यांना व्हील चेअर भेट देण्यात आली.


या वेळी श्री साई ट्रस्टचे अध्यक्ष गणेश नायर, संचालिका राधिका घुले तसेच जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले, माजी सदस्य जयेंद्र कराळे तसेच प्रशांत कराळे, किसन कराळे आदी उपस्थित होते.



## पाच दिवसांच्या घरगुती गणपती बाप्पांचे विसर्जन

**पनवेल : वार्ताहर**

दिड दिवसाच्या गणपती नंतर पाच दिवसांच्या घरगुती गणपती बाप्पांचे पनवेल महानगर पालिकेच्या रोटरी गणेश विसर्जन तलावात उत्साहपूर्ण वातावरणात, शांततेत विसर्जन करण्यात आले.



रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल, पनवेल महानगर पालिका, पनवेल शहर पोलीस व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांनी केलेल्या विसर्जनासाठीच्या आवाहनास पनवेलकर गणेशभक्तांचा उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला.

विसर्जन सेवेसाठी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे सदस्य, पनवेल महानगर पालिकेचे कर्मचारी, पनवेल शहर पोलीस यंत्रणा, पनवेल शहर वाहतूक पोलीस यंत्रणे सोबत अनेक सामाजिक संस्था ही सहभागी झाल्या होत्या. दोन तराफे व होडी सह गणेश विसर्जन पथकाचे बारा कार्यकर्ते गणपतींचे विसर्जन करीत होते. काही पर्यावरण प्रेमींनी नवीन पनवेल, खांदा कॉलनी तसेच शहरातील विविध भागातून आपले गणपती बाप्पा आणुन सदर रोटरी गणेश विसर्जन तलावात विसर्जित केले.

या वेळी पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त वैभव विधाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, वाहतूक पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी भेट देऊन आपापल्या विभागातील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून योग्य नियोजन केले होते. प्रथमच या विसर्जन सोहळ्याचे युट्युब द्वारे सर्व गणेश भक्तांना लाईव्ह दर्शन करण्याची योजना रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत करण्यात आली जेणेकरून ज्येष्ठ गणेश भक्तांना आपल्या गणेशाचे विसर्जन आपल्या घरी बसून पाहता आले.

तलाव व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबर निर्माल्य गोळा करून त्याचे योग्यनियोजन करण्याची जबाबदारी महापालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड व स्वच्छता निरीक्षक जयेश कांबळे यांनी चोख बजावली. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे संस्थापकीय सदस्य माजी रोटरी प्रांतपाल, पनवेल मधील जेष्ठ शल्य चिकित्सक डॉ. गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव व सदर प्रकल्पाचे प्रमुख दीपक गडगे, खजिनदार ऋषिकेश बुवा यांचेसह क्लबचे सर्व सदस्य,एन्स तसेच इतर सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्या सहकार्याने हा विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे झाला.

## पारंपरिक पद्धतीने गौराईचे पूजन

**रसायनी : प्रतिनिधी**

सोनपावलांनी गौराईचे आगमन झाले. अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीने गौराईचे पूजन करण्यता आले. गौराईच्या आगमनामुळे सर्वत्र ठिकाणी चैतन्यांचे वातावरण निर्माण झाले आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तीची मागणी वाढली असल्यामुळे बदलत्या काळात पारंपारिकतेने घरी सजवलेली गौराई ग्रामीण भागात ही आता तुरळक ठिकाणी पहावयास मिळत आहे.



माहेरवाशिणीच्या रूपात समृद्धीचा जागर गौरी-गणपतीचा हा सण कोकणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गौराई म्हणजे घरातील माहेरवाशीण यामुळे तिची सजावट, तेरड्याच्या झाडांचा गुच्छ महिला तयार करून गौराई घरी सजविण्यात आली. संपूर्ण रात्र जागरण करून दुसर्या दिवशी या गौराईचे पूजन केले जाते. रानटी भेंडी, आघाड्याचे पाने, तेरड्याची फुले, आईनाचे फळ, काकडी यांचा वापर करून गौराईचे पूजन करण्यात आले.

तिच्यासाठी जागरण आणि दुसऱ्या दिवशी या गौराईचे पूजनाला ओवसा असे म्हटले जाते. गौराईचे हे सुखसोहळे महिलावर्ग मोठ्या उत्साहाने करीत पारंपरिक पद्धतीने विविध गाणी म्हटली जात होती. गौराईच्या जागरणासाठी महिला वर्ग खेळ खेळले दंग झाले होते. अशा भक्तीमय वातावरणात सर्वत्र ठिकाणी चैतन्य निर्माण झाले होते. गणेशाचे आगमन होऊन तीन दिवस उलटले असून, गुरुवारी गौरींचे वाजत गाजत आगमन झाले.

काळाच्या ओघात मागे जूनी परंपरा काळाच्या पडद्याआड पडू लागली असली तरी सुद्धा ग्रामीण भागात जुन्या पद्धतीने भारतीय संस्कृती जोपासुन पुजन करण्यात आले.

पान १ वरुन

### शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राज्यातील मंत्र्यांचे शिष्टमंडळ केंद्रीय मंत्र्यांची भेट घेणार

पीकविमा संबंधी केंद्रीय कृषिमंत्र्यांशी याबाबत चर्चा झाली आहे. विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून शेतकरी हिताचा तोडगा काढण्यात येईल. यावर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांच्या व शेतजमीनीच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहेत. एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

### जेएनपीए बंदरात मालाची अदलाबदल करून तस्करी

मोठ्या चतुराईने तस्करी मार्गाने या १० कोटींचे रक्तचंदन शारजात पाठविण्याच्या तयारीत असल्याची माहिती न्हावा-शेवा सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. वेळ न दवडता शिताफीने न्हावा शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबीच्या अधिकाऱ्यांनी जहाजांवर चढविण्याच्या तयारीत असलेल्या कंटेनरची कसून तपासणी केली होती.

या तपासणीनंतर मालाची आंतरराष्ट्रीय माफियांच्या टोळीने शिताफीने अदलाबदली केलेल्या रक्तचंदनाच्या मालाचे प्रकरण उघडकीस आले. याप्रकरणी न्हावा शेवा सीमा शुल्क विभागाच्या एसआयआयबीच्या अधिकाऱ्यांनी ट्रान्सपोर्ट कंपनीचा मालक अक्षय भाऊसाहेब आणि ट्रक-कंटेनरचालक गणेश सुखधरे यांना अटक केली आहे, तर निर्यातदार, आणखी एक मालक फरार झाले आहेत. न्यायालयाने दोन्ही संशयित आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

### आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

कोणत्या मतदारांना टपाल मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करून द्यायची आहे हेदेखील बीएलओला माहित असावे. सोशल मीडियावर विशेष नजर ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करावी. निवडणुकीवर प्रभाव टाकणारी सामग्री रोखण्यासाठी जिल्हा आणि राज्याच्या सीमेवर चौक्या उभारण्यात याव्यात. फ्लाइंग स्क्वॉड आणि एसएसटीसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे. निवडणूक संबंधित तक्रारींसाठी तयार करण्यात आलेल्या सी-व्हिजिल मोबाईल पवर लक्ष ठेवावे. तत्काळ निराकरण करावे. मतदार जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी. आदिवासी वाड्या वस्त्या याठिकाणी तसेच मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या भागाकडे विशेष लक्ष द्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

## कोकणी मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनची सभा

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा-खारघर भागातील कोकणी मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनची सभा नुकतीच झाली.

कोकणातील अनेक व्यक्ती आपापल्या कौटुंबिक गरजांची पूर्तता करण्यासाठी खारघर-तळोजा व जवळपासच्या परिसरात स्वत:ची घरे घेऊन, तर काही भाड्याने घरे घेऊन वास्तव्य करीत असताना त्यांना संघटित करून, त्यांच्या अडीअडचणीना एकमेकांची मदत व्हावी, सुखदु:खात हातभार लागावा, मुलांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करून त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, त्यांचा चांगला विकास व्हावा व या पिढीचा उपयोग अधिक प्रभावशाली व्हावा अशा अनेक उद्देशानें काही समविचारी लोकांनी एकत्र येत चर्चा व्हावी व त्यांच्या या विचारातून समाजाचे भले व्हावे म्हणून अलिकडेच सभा बोलावण्यात आली होती.

या सभेला उद्योजक सुशिक्षित, अनुभवी व सामाजिक कार्यकर्ते व तरुण असे सर्व स्तरावरचे लोक एकत्र आल्याचे दिसून आले. या सभेत नौफिल सय्यद यांची सर्वानुमते कोकणी मुस्लिम वेल्फेअर अससोसिएशन तळोजा खारघर या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या सभेला शमीमभाई तांबे, अमजद काद्री, नौफिल सय्यद, वसीमभाई परकार, फैसेलभाई शिवकर, तिसेकर सर, इक्बाल मुकादम, शकील जासनाईक, निजामभाई हमदूले, हमीद हमदुले, सफवान पटेल, जुबैरभाई सिद्दीकी, फैज परकार, अम्मार मदार, इरफान उके, हुसैन हमदूले, रफिक परकार, मुखतर परकार, अब्बास हमदुले, गौस खतीब, नावाफ सिद्दीकी, जुबैर हमदुले, रहमान परकार आदी उपस्थित होते.

## मुंबईत बोधी कला कार्यशाळा

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ (ट्रस्ट) आणि बोधी नाट्य परिषद, मुंबई या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ४७ वी बोधी कला कार्यशाळा, शिवाजी मंदिर, दादर, मुंबई येथे शनिवारी (दि. २८) सकाळी १० ते २ आणि रविवारी (दि. २९) सकाळी १० ते ५ या वेळात आयोजित केली आहे.

या कला कार्यशाळेचा विषय आहे नाटक... या कार्यशाळेत रवींद्र लाखे लिखित, 'राज्य एकट्यावरच असतं', महेंद्र कुरघोडे लिखित,'संत तुकारामाची दुसरी हत्या' आणि रवींद्र इंगळे चावरेकर लिखित, इ.स. आठवे शतक अशी तीन नवी नाटके वाचली जाणारी आहेत व नंतर नाट्य अभ्यासक अरूण कदम, गिरीश पतके, डॉ. विठ्ठल शिंदे, डॉ अनिल बांदिवडेकर, अविनाश कोल्हे, राजीव जोशी, डॉ.मिलिंद इनामदार, भगवान हिरे, डॉ. प्रदीप सरवदे, भालचंद्र कुबल, राज बाळदकर, प्रेमानंद गज्वी आदी नाट्य अभ्यासक चर्चा करतील.

या कार्यशाळेचे उद्घाटन साहित्य समीक्षाकार अवधूत परळकर करणार असून अध्यक्षस्थानी डॉ. सुरेश मेश्राम असतील. या नाट्यलेखन कार्यशाळेचे सूत्रसंचालन नाटककार अशोक हंडोरे करणार आहेत. ही कार्यशाळा केवळ निमंत्रित मान्यवरांसाठी आहे. तथापि नाटक समजून घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ज्येष्ठ लेखक आणि नाटककार प्रेमानंद गज्वी (९८२१७७१८८४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**दुखवटा**

### ताराबाई पाटील



**खोपोली :** नगरपालिका हद्दीतील लव्हेज या गावच्या ज्येष्ठ ग्रामस्थ ताराबाई राम पाटील यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पक्षात तीन विवाहित मुले, एक विवाहित कन्या, नातवंड असा मोठा परिवार आहे. कै. ताराबाई यांचे दशक्रिया विधी १५ सप्टेंबर रोजी ताकई येथे, तर दिवसकार्य १८ सप्टेंबर रोजी राहत्या घरी योजीले आहे.



पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या घरातील विराजमान गणरायाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी भगत कुटुंबीयांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देत स्वागत केले.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, कळंबोली मंडल सरचिटणीस दिलीप बिस्ट, माजी नगरसेवक अजय बहिरा आदींनी दर्शन घेतले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले.



नवी मुंबई : बेलापूर सकाळ भवनमध्ये सकाळ समूहाच्या वतीने विघ्नहर्ता गणरायाचे आगमन झाले आहे. या लाडक्या बाप्पाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत आरती केली. या वेळी आमदार संदीप नाईक यांनीही गणरायाचे दर्शन घेतले.

















पनवेल : गणेशोत्सवानिमित्त भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यात ठिकठिकाणी विराजमान झालेल्या गौरी आणि गणपतींचे मनोभावे दर्शन घेतले. यामध्ये त्यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, सदा देशमुख, प्रमोद कोहली, विश्वनाथ कोळ, शेलघर येथे प्रशांत भगत, दयानंद भगत, शंकर भगत, तुकाराम भगत यांच्या घरातील विराजमान गणरायांचे दर्शन घेतले.



उलवे नोड : खारकोपर येथील अनिल भाऊराव देशमुख यांच्या घरातील विराजमान गौरी आणि गणपती.




उलवे नोड : येथील उत्तम कोळी यांच्या घरातील गौरी.



शिवांश राहुल भगत, खारघर गाव



विजय पांडुरंग भोपी, शिरढोण, पनवेल



युवा मोर्चा पनवेल (ग्रामीण) चिटणीस रोशन पाटील, तारा



पनवेल : पळस्पे येथील भाजप नेते शशिकांत दत्तात्रेय ठोंबरे यांच्या घरातील बाप्पा.



सत्यवान जोमा काकडे, आदई, पनवेल



विलास कृष्णा ठाकूर, केळवणे



गणेश कदम, करंजाडे



उरण : टाकी गाव येथील अरूण जनार्दन नाईक यांच्या घरातील गौरी आणि गणपती.




पनवेल : ग्रामपंचायत दिघाटीच्या माजी सदस्या स्मिता राजेश ठाकूर यांच्या घरी गौरी विराजमान.



महाड : येथील वैद्य परिवाराची खड्यांची गौराई.



अलिबाग : थळ येथील दाते कुटुंबाची गौराई.



पनवेल : धरणा कॅम्प गावातील पवार कुटुंबीयांची गौरी.



शर्मिला अनिल यादव, आदई, पनवेल



झील विजय ठाकूर, खांदा कॉलनी



पनवेल : साई कासारभाट ग्रामपंचायतीचे सदस्य सुजित पाटील यांच्या घरातील बाप्पा.



योगिता मुरबाडे, कामोठे, पनवेल



संजय चंद्रकांत काठावले, भाताण



तेजस लबडे, खानावळे, पनवेल

## संपादकीय

# टीकेतून देशाची बदनामी

भारतीय राजकारणात प्रेम, आदर आणि नम्रता यांचा अभाव आहे असे वक्तव्य काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी टेक्सासमधील भारतीय अमेरिकन समुदायासमोर केले. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तर त्यांनी यथेच्छ टीका केलीच, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भारतात अनेक कारखाने बंद पडत असल्याचा शोधही लावला. परदेशात जाऊन स्वत:च्या देशाची बदनामी करणारे राहुल गांधी हे भारतीय लोकशाहीवरील काळा डाग असल्याचे तिखट प्रत्युत्तर भाजपने या बिनबुडाच्या टीकेवर दिले आहे.

**देशात-विदेशात कुठेही बोलताना निव्वळ निवडणुकांच्या राजकारणावर डोळा ठेवून आपली नकारात्मक भूमिका मांडत राहायचे हा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा सध्याचा एककलमी कार्यक्रम आहे का, असा प्रश्न राहुल गांधी यांच्या ताज्या अमेरिका दौऱ्यातील विविध वक्तव्यांवरून कुणालाही पडावा. बोलताना मात्र ते या लढाईचा राजकारणाशी संबंध नाही असा उल्लेख तेवढा करतात आणि पुढे ओकायची ती राजकीय गरळच ओकतात. भारतात म्हणे, शिखांना व अन्य काही धर्मियांना त्यांच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य नाही. भारतात धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच होतो आहे, असे म्हणत, भविष्यात शिखांना मोकळेपणाने पगडी बांधता येईल का, हातात कडे घालता येईल का, गुरुद्वारात जाता येईल का? असा प्रश्न राहुल गांधी विचारतात. वास्तविक, १९८४मधील शीखविरोधी दंगली अद्यापही हा समाज विसरलेला नाही. केवळ त्या एकमेव कालखंडात भारतात शिखांकरिता त्यांची पगडी ही असुरक्षिततेचे कारण बनली होती असे सडेतोड उत्तर यावर केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांनी दिले हे बरेच झाले असे म्हणावे लागेल. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला विरोध आणि मोदीद्वेष यांच्या भरात आपण आपल्याच देशाची बदनामी करत आहोत हे राहुल गांधी यांच्या ध्यानात येत नसावे का? भारतीय अर्थव्यवस्थेची वेगाने सुरू असलेली घोडदौड ही सध्या जगभरात कौतुकाचा विषय ठरली आहे. विशेषत: कोविडच्या पार्श्वभूमीवर भारत ज्या तऱ्हेने सावरला व भारताने मोदी सरकारच्या कार्यकाळात गेल्या दहा वर्षांत केलेला आर्थिक विकास याबद्दल आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व एकंदरच युरोप-अमेरिकेतील अनेक आर्थिक संस्था व कंपन्या कौतुकाचे बोल काढत असताना, देशाचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी हे मोदींमुळे देशातील कारखाने बंद पडत चालले आहेत असे विधान अमेरिकेत जाऊन कशाच्या आधारावर करतात? गेल्या पाच वर्षांत भारतात अब्जावधी डॉलरची गुंतवणूक झाली आहे हे सर्वज्ञात आहे. अनेक नामांकित कंपन्या आज भारतात सेमीकंडक्टरची चिप, मोबाइल आदी उत्पादने बनवत आहेत. जगभरात एक प्रतिष्ठित उत्पादन गणला जाणारा आयफोनही सध्या भारतात तयार होतो. संरक्षण सामग्रीच्या बाबतीत भारत कधी नव्हे इतका आज देशांतर्गत उत्पादन करतो आहे. देशातील परिस्थिती सर्वार्थाने सकारात्मकरित्या बदलत असताना राहुल गांधी यांनी देशाबद्दल अशी बेजबाबदार नकारात्मक विधाने का करावीत? बहुदा मोदी यांची देशविदेशातील अतिशय लोकप्रिय अशी प्रतिमा राहुल गांधी यांना खलत असावी व त्यामुळेच ते अत्यंत व्यक्तिगत स्वरूपाची अशी टीका मोदींविरोधात करताना दिसतात. वास्तविक विरोधीपक्ष नेते पद हे संसदीय लोकशाहीत अतिशय मानाचे पद गणले जाते. या पदावरील व्यक्तीने जबाबदारीने, रचनात्मक विरोध करणे अपेक्षित असते. परंतु राहुल गांधी यांना हे कोण कसे समजावणार?**

# योजना आणि नागरिकांना जोडणारा उपक्रम मुख्यमंत्री योजनादूत

महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. या लोककल्याणकारी योजनांचे प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने शासन आपल्या दारी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेला होता. या अंतर्गत राज्यातील लाखो नागरिकांना विविध शासकीय योजनांचा एका छताखाली लाभ देण्यात शासन यशस्वी झाले होते. याच उपक्रमाचा विस्तार म्हणजे मुख्यमंत्री योजनादूत असून याचा मुख्य उद्देश सामाजिक बदल घडविण्यासाठी उत्सुक असलेल्या ५० हजार तरुणांच्या प्रयत्नांद्वारे जनतेपर्यंत पोहचणे हा आहे. कल्याणकारी योजना आणि नागरिकांना जोडणारा उपक्रम म्हणजेच मुख्यमंत्री योजनादूत होय.

### कार्यक्रमाची रुपरेषा

१) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जातील. २) ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येईल. ३) मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १०,००० प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येईल. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित) ४) निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत सहा महिन्यांचा करार केला जाईल व हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

### उमेदवार निवड प्रक्रिया निकष

उमेदवाराचा वयोगट १८ ते ३५ असावा. कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा. उमेदवाराला संगणक ज्ञान असणे आवश्यक. उमेदवाराकडे अद्यावत मोबाईल असणे आवश्यक. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. उमेदवारांचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे.

### उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे

विहित नमुन्यातील मुख्यमंत्री योजना दूत कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज. आधार कार्ड. पदवी उत्तीर्ण असल्याचे पुराव्यादाखल कागदपत्रे/प्रमाणपत्र. अधिवासाचा दाखला (सक्षम यंत्रणेने दिलेला). वैयक्तिक बँक खात्याचा तपशील. पासपोर्ट साईज फोटो. हमीपत्र (ऑनलाइन अर्जासोबतच्या नमुन्यामध्ये)

### उमेदवारास होणारे फायदे

प्रत्यक्ष कामाचा अनुभव. सामाजिक बदलाचा भाग होण्याची संधी. विद्या वेतनातून युवकांना आर्थिक सहाय्य. शिकण्याबरोबरच कौशल्य विकास.

### मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक प्रक्रिया

१) उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात बाह्यसंस्थांमार्फत ऑनलाईनरीत्या पूर्ण करण्यात येईल. २) ऑनलाईनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल. जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील (यामध्ये उमेदवारांची शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील). त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर ६ महिन्याचा करार केला जाईल. कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही. ३) जिल्हा माहिती अधिकारी वरील प्रमाणे शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन (Orientation) करतील. ४) जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, (कौशल्य विकास रोजगार) व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक/शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून पाठवतील.

या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. या नेमणुकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही याबाबतचे हमीपत्र उमेदवाराकडून घेण्यात यावे.

### निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे

१) योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील. २) प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहिल. ३) योजनादूत शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करताना ग्रामपातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील. ४) योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करुन तो ऑनलाईन अपलोड करतील. ५) योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वार्थासाठी/नियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत. योजनादूत तसे करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. ६) योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

उपसंचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांची जबाबदारी.

१) विभागीय स्तरावर विभागीय संचालक/उपसंचालक (माहिती) या योजनेचे सनियंत्रण करतील. जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा विभागीय स्तरावर घेतला जाईल. २) जिल्हा माहिती अधिकारी हा सदर योजनेसाठी संबंधित जिल्हयाचा नोडल ऑफीसर असेल. ३) संबंधित जिल्ह्यातील योजनादूतांनी विहित नमुन्यात ऑनलाईन अपलोड केलेल्या त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा जिल्हा माहिती अधिकारी घेतील तसेच, संबंधित योजनादूतांना त्यांच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करतील.

### योजनादूत कार्यक्रमाच्या संचलनासाठी बाह्यसंस्थांमार्फत करावयाची कामे

१) उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी करणे. २) उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची तसेच, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची छाननी करणे व पात्र उमेदवारांच्या नावांची यादी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना ऑनलाईन उपलब्ध करुन देणे. ३) निवडण्यात आलेले योजनादूत यांना जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने समुपदेशन व निर्देशन (Orientation), कामकाजाचे वाटप इ. बाबतीत सनियंत्रण करणे. ४) योजनादूतांना कामाचे वाटप झाल्यानंतर त्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबतचा (हजेरी) ऑनलाईन पद्धतीने अहवाल घेणे. मुख्यालय स्तरावरील उपसंचालक (वृत्त) (नोडल ऑफिसर) यांना याबाबत आवश्यक असेल तेव्हा माहिती देणे. तसेच उपस्थितीबाबतचा व अन्य बाबींचा साप्ताहिक अहवाल त्यांना सादर करणे. ५) योजनादूतांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाचा ऑनलाईन अहवाल घेणे. हा अहवाल जिल्हा माहिती अधिकारी व नोडल ऑफिसर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना पाठविणे. ६) योजनादूतांच्या मानधनाची देयके तयार करुन जिल्हा माहिती अधिकारी यांना सादर करणे. त्याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबी सादर करणे.

### अर्थसंकल्पीय तरतूद

या कार्यक्रमाच्या अंमबजावणीसाठी ५० हजार योजनादूत यांना प्रतिमा १० हजार रुपये या प्रमाणे सहा महिन्याकरिता अंदाजे ३०० कोटी इतका खर्च येणार आहे. हा खर्च कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येईल. योजना दूतांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्ट प्रमाणे काम केले आहे का नाही याची खातरजमा माहिती जनसंपर्क विभाग करेल व त्यानंतरच योजनादुतांना मासिक मानधन अदा करण्यात येईल. ही कार्यवाही प्रत्येक महिन्याच्या दोन तारखेपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

### सुमारे ५० हजार योजनादूतची भरती

मुख्यमंत्री योजना दूध अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभरात सुमारे ५० हजार योजनादूत पदांची सहा महिन्यांसाठी भरती केली जाणार आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक योजना दूत ला प्रतीमहा दहा हजार रुपये मानधन देण्यात येणार असून राज्याच्या कौशल्य विकास नाविन्यता रोजगार विभागाच्या वतीने हे मानधन निवड झालेल्या उमेदवाराच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी (२७८३४), प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी (५३८३) एक तर महानगरपालिकेच्या १२९६ वार्डसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यात एकूण ४७ हजार ५१६ योजनादूतची निवड केली जाणार आहे. म्हणजे शहरी भागात १९ हजार ६८२ व ग्रामीण भागात २७ हजार ८३४ योजनादूत लवकरच निवडले जाणार आहेत.

याप्रमाणे राज्य शासन प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक करून शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार करणार आहे. या पन्नास हजार योजनादुतांना जिल्हास्तर तसेच उपविभाग स्तरावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून हे योजनादूत कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा दुवा ठरतील व प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील याची खात्री वाटते.

**-सुनील सोनटक्के,**
**माहिती व जनसंपर्क संचालनालय**



## बदलते तंत्रज्ञान

# आधारकार्ड अपडेट करा; अन्यथा भरावा लागेल दंड

आधार कार्ड हे एक महत्त्वाचे ओळखपत्र आहे. हे अतिशय महत्त्वाचे कागदपत्रे असून प्रत्येक भारतीयाजवळ असणे अनिवार्य आहे, कारण आधार कार्डमुळे तुमची एक ओळख शासनदरबारी तयार होते. त्यामुळे तुमचे आधारकार्ड अपडेटेड आहे आहे का? अनेकदा आधारकार्ड अपडेट न केल्यामुळे अनेक कामे अडतात. त्यामुळे वेळीच आधारकार्ड अपडेट करणे गरजेचे असते.



जर तुमचे आधार कार्ड फार पूर्वी काढले असेल आणि अजूनही अपडेट केले नसेल, तर कोणताही वेळ न घालवता आधार कार्ड अपडेट करा, कारण आधार कार्ड अपडेट करण्याची अंतिम तारीख १४ सप्टेंबर आहे. तुमचे आधार अपडेट करण्यासाठी तुम्हाला ओळखीचा आणि पत्त्याचा पुरावा द्यावा लागेल.

जर तुम्ही १४ सप्टेंबरपर्यंत आधारकार्ड अपडेट केले नाही तर Unique Identification Authority of India (UIDAI) ५० रुपयांचा दंड आकारेल. Unique Identification Authority तुमचा आधार क्रमांक बायोमेट्रिक माहितीसह UIDAIच्या सेंट्रल आयडेंटिटी डेटा रिपॉझिटरी (CIDR)मध्ये जमा करते. त्यानंतर UIDAI तुम्ही दिलेली माहिती तपासते. अतिरिक्त शुल्क टाळण्यासाठी लगेच आधार कार्ड अपडेट करा.

ऑनलाईन आधार कार्ड अपडेट कसे करावे?

- myaadhaar.uidai.gov. या वेबसाइटवर जा आणि तुमचा आधार क्रमांक वापरून लॉग इन करा.

-जो मोबाईल क्रमांक आधार कार्डशी लिंक आहे त्यावर तुम्हाला ओटीपी येईल.

त्यानंतर तुमच्याविषयी दिसत असलेली माहिती योग्य आहे का, हे नीट तपासा.

जर तुम्हाला माहिती अपडेट करायची असेल तर तुमच्या मेनूमधून माहिती अपलोड करा.

प्रत्येक फाइल दोन MBपेक्षा कमी आणि JPEG, PNG किंवा PDF फॉरमॅटमध्ये असल्याची खात्री करा.

निवडलेले कागदपत्र अपलोड करा. सर्व माहितीचे पुन्हा तपासा. तुमचा आधारकार्ड अपडेट करण्यासाठी सबमिट बटणवर क्लिक करा. यानंतर तुमचे आधारकार्ड अपडेट होईल.

# साहित्य संशोधक, ग्रंथकार विनायक भावे



## निमित्त

मराठी साहित्यसंशोधक आणि ग्रंथाकार तसेच महाराष्ट्र सारस्वत या प्राचीन मराठी साहित्येतिहासग्रंथाचे कर्ते अशी विनायक लक्ष्मण भावे यांची ओळख राहिली आहे. त्यांचा आज स्मृतिदिन.

विनायक भावे यांचा जन्म ६ नोव्हेंबर १८७१ रोजी कुलाबा (विद्यमान रायगड) जिल्ह्यातील पळस्पे या गावी झाला. त्यांचे मराठी व इंग्रजी शिक्षण ठाणे येथे झाले. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बीएस्सी झाले. ठाणे येथे माध्यमिक शिक्षण घेत असताना काव्येतिहाससंग्रह या मासिकाचे एक संपादक जनार्दन बाळाजी मोडक हे त्यांना मुख्याध्यापक म्हणून लाभले. त्यांचा सहवास व मार्गदर्शन यामुळे भावे यांना मराठी काव्ये वाचण्याची गोडी लागली. शालेय जीवनातच ते मराठी काव्ये आणि कविचरित्रे याविषयी निबंध लिहू लागले होते.

महाराष्ट्र सारस्वताच्या पहिल्या आवृत्तीचे लेखन त्यांनी महाविद्यालयात शिकत असतानाच केले होते. १८९३मध्ये ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाची त्यांनी स्थापना केली. १८९८मध्ये त्यांचे वडील मरण पावले. त्यानंतर वडिलांच्या मिठागरात लक्ष घालून त्यांनी मिठाचा व्यापार सुरू केला व त्यात यश मिळविले. १९१८ साली ते त्या व्यापारातून निवृत्त झाले व उर्वरित आयुष्य त्यांनी सर्वस्वी विद्याव्यासंगात घालविले.

महाराष्ट्र सारस्वत हाच भावे यांचा पहिला ग्रंथ होय. त्याची पहिली आवृत्ती विष्णू गोविंद विजापूरकरसंपादित ग्रंथमाला या मासिकात क्रमशः प्रसिद्ध झाली (मार्च १८९८ ते मे १८९९). त्यानंतर या ग्रंथाच्या पाच आवृत्त्या निघाल्या (१९१९, १९२४ १९२८, १९५१, १९६३, १९८२). यापैकी तिसरी आवृत्ती दोन भागांत प्रसिद्ध झाली होती. या ग्रंथाची पहिली आवृत्ती म्हणजे केवळ ९८ पृष्ठांचा एक निबंध होता. तथापि, त्यात भावे यांनी पुढे सतत भर घातल्यामुळे तिसऱ्या आवृत्तीपर्यंत हा ग्रंथ ७४४ पृष्ठांपर्यंत वाढला. चौथा आवृत्ती अद्ययावत करण्याच्या दृष्टीने तिचे संपादक शं.गो. तुळपुळे यांनी सु. २५० पृष्ठांची एक पुरवणी तिला जोडली. पाचव्या आवृत्तीत या पुरवणीत आणखी सु. १०० पृष्ठांची भर पडली. सहाव्या आवृत्तीत या ग्रंथांची विभागणी दोन खंडांत केली आहे : पहिला खंड हा वि. ल. भावलेखित मूळ ग्रंथ असून दुसरा खंड हा शं.गो. तुळपुळे यांनी तयार केलेल्या पुरवणीचा आहे. अशा प्रकारे हा ग्रंथ वाढत गेला.

मराठी साहित्याचा १८१८पर्यंतचा इतिहास महाराष्ट्र सारस्वतात आलेला आहे. मराठी भाषेच्या मूळपीठिकेपासून आरंभ करून पेशवाईअखेरील कवीपर्यंत भावे आलेले आहेत. महानुभव संत आणि त्यांचे साहित्य यांचा परिचय महाराष्ट्र सारस्वतातून करून देऊन त्या साहित्याच्या संशोधनाच्या कामीही त्यांनी महत्त्वाची भर घातली. प्राचीन मराठी साहित्येतिहासावरील एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून आजही ह्या ग्रंथाला मान्यता आहे.

प्राचीन साहित्याच्या संपादनाचेही कार्य त्यांनी केले. अज्ञानदासकृत अफजलखानाचा पोवाडा, श्री जयरामस्वामी (वडगावकर) कृत अपरोक्षानुभव (१९०५), तुकारामबुवांचा अस्सल गाथा (भाग १ व २ १९१९ , १९२०), पंडित दामोदरकृत वच्छहरण (१९२४) आणि कवीश्वर भास्करकृत शिशुपालवध (१९२६) ही त्यांची काही उल्लेखनीय संपादने. इतिहाससंशोधनातही भावे यांना रस होता. मराठी दफ्तराचे तीन रूमाल त्यांनी संपादिले आहेत (१९१७, १९२२, १९२८). चक्रवर्ती नेपोलियन (तीन खंड, १९२१, १९२२, १९२२) हा त्यांनी लिहिलेला चरित्रग्रंथही प्रसिद्ध असून मराठी चरित्रात त्याने लक्षणीय भर घातली आहे. वारसा (१९७१) या नावाने त्यांचे काही स्फुट लेखन संकलित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सारस्वत हा वि.ल.भावे यांचा ग्रंथ इतका गाजला की ते महाराष्ट्र सारस्वतकार म्हणून ओळखले जातात. नेपोलियनचे चरित्रही त्यांनी प्रथमच मराठीत आणले. ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात त्यांचा १२ सप्टेंबर हा स्मृतिदिन आजही पाळला जातो. पुणे येथे १२ सप्टेंबर १९२६ रोजी ते निधन पावले. (साभार : मराठी विश्वकोष)

## क्लिक...क्लिक...!



मुरूड : येथे घराघरांत गौरीची विविध रूपे साकारली आहेत. त्यांचे सुधीर नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र.

## आरोग्य प्रहर

# पाठदुखी दूर करण्यासाठी ‘हे’ पदार्थ बंद करा!

दिवसभराच्या बैठ्या कामांनी अनेकदा पाठ अवघडते. लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर काम असल्याने बसून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. एकाच आसनात बराच वेळ बसल्याने पाठदुखी होते.तुम्हाला जर पाठदुखीची समस्या असेल, तर काही पदार्थांपासून तुम्ही दूर राहणे गरजेचे आहे. हे पदार्थ नेमके कोणते ते जाणून घेऊ...



फिटनेस व पोषण शास्त्रज्ञ आणि फूड दरझीचे सह-संस्थापक डॉ. सिद्धांत भार्गव यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. ज्यांना पाठदुखीची समस्या आहे त्यांनी साखर, साखरयुक्त सिरप, मका आणि तेल याचा आहारात समावेश करू नये. नैसर्गिक वा प्रक्रिया न केलेला मका हा आरोग्यदायी असला तरी प्रक्रियेदरम्यान त्यातील पोषक तत्त्वे निघून जातात आणि त्याचा आपल्या शरीरावर वेगळा परिणाम होतो. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या आहारात मक्याचा समावेश करीत असाल, तर तो प्रक्रिया केलेला नसावा. प्रक्रिया केलेला मका खाल्ल्यानं पाठीच्या खालच्या वेदना वाढू शकतात.

डॉ. सिद्धांत भार्गव यांच्या मते, प्रक्रिया केलेल्या मक्यामुळे इन्सुलिनच्या पातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते आणि त्यामुळे जळजळ आणि वजन वाढू शकते. जास्त वजनामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण पडतो आणि पाठीच्या खालच्या भागात दुखणे वाढते. तसेच यामुळे जळजळ बरे होण्याची प्रक्रिया मंद होऊ शकते आणि पाठीच्या खालच्या भागात दुखण्यासारखी परिस्थिती वाढू शकते.

मक्यामध्ये बी जीवनसत्त्व आणि खनिजे तसेच फायबर असते. मध्यम प्रमाणात सेवन केल्यास एकूण आरोग्यासाठी हे घटक चांगले असू शकतात. संपूर्ण मक्यामध्ये अँटिऑक्सिडंट्सदेखील असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार दाहकविरोधी आहारामुळे पाठदुखी कमी होण्यास मदत होते. भरपूर फळे आणि भाज्या खाणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात.

स्वयंपाक करताना हळद किंवा आले घातल्याने शक्तिशाली दाहकविरोधी फायदेदेखील मिळू शकतात तसेच भरपूर पाणी प्यायल्याने आपले शरीर हायड्रेट राहते आणि त्यामुळे स्नायूंमधील कडकपणा कमी होऊन संपूर्ण आरोग्याला चालना मिळते, असे डॉ. भार्गव म्हणाले.

# पळसदरी-कर्जत मार्ग बनतोय धोकादायक


विविध प्रकल्पाचे साईडपट्टीवर अतिक्रमण

**खोपोली : प्रतिनिधी**

दोन तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग असलेला खालापूर पळसदरी मार्गे कर्जत रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असून, भरीस भर म्हणून रस्ता लगत सुरू असलेल्या विकास प्रकल्पामुळे बाजू पट्टीदेखील बाधित झाली आहे.

कर्जत खालापूर तालुक्याला जोडणारा अतिशय महत्त्वाचा रस्ता गेल्या पाच वर्षापासून रखडला आहे. राष्ट्रीय महामार्ग ५४८ शाहापुर, मुरबाड, कर्जत, पळसदरी, खोपोली, वाकण असा जात आहे. रस्त्याचे जवळपास काम पूर्ण झाले असून खालापूर , कर्जत हद्दीत नालदे, सुगवे, वारे, पळसदरी, नावडे, अंजरूण, हाळ भागात शेतकऱ्यांना त्यांच्या जागेचा मोबदला न दिल्याने काम अडवले आहे. अपूर्ण काम, असलेल्या रस्ताची प्रचंड दुरावस्था झाली आहे. अनेक जिवघेणे अपघातदेखील घडत आहेत. सध्या नावंडे गावाचे हद्दीत विकास प्रकल्प सुरू असून महामार्गालगत मोठ्या प्रमाणात बाजूपट्टीवर माती जमा झाली असून ठिकाणी सतत जेसीबीने काम सुरू असल्याने वाहतुकीला देखील अडथळा निर्माण होत आहे.

याठिकाणी लागणारे मटेरियल रस्त्याच्या दुतर्फा उतरवले जात असल्याने अधिक अरुंद असलेला रस्ता अधिकच प्रवासासाठी अडचणीचा ठरत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी संदीप पाटील यांनी काही दिवसांपूर्वी या रस्त्याची पाहणी केली होती. परंतु आवश्यक ती उपाययोजना होत नसल्याने पाहणी केवळ फार्स ठरत आहे.

**पळसदरी मार्गे कर्जत रस्ता प्रवास जीवघेणा ठरत आहे. त्यात काही विकसक रस्ता आंदण घेतल्या सारख वागत आहेत. बाजुपट्टीवरिल चिखल रस्त्यावर आल्याने दुचाकी साठी रस्ता अधिकच धोकादायक बनला आहे.**

**–दीपक जगताप, खालापूर शहर अध्यक्ष, भाजप**

# कर्जत तिहेरी हत्याकांडमधील आरोपीला फाशी देण्याची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ कळंब रस्त्यावरील चिकणपाडा गावातील पोशिर पाडा येथे राहणाऱ्या तिघांचा खून करणाऱ्या हनुमंत जैतू पाटील यास फाशी देण्यात यावी, अशी मागणी त्या भागातील ग्रामस्थांनी निवेदन देऊन केली. नेरळ पोलीस ठाणे येथे माले, चिकणपाडा, बोरगाव येथील ग्रामस्थांनी निवेदन देवून ही मागणी केली आहे.

मूळचे बोरगाव येथील रहिवाशी असलेले मदन जैतू पाटील, अनिशा मदन पाटील आणि दहा वर्षांचा मुलगा विवेक मदन पाटील या तिघांचा खून आठ सप्टेंबरच्या पहाटे हनुमंत जैतू पाटील याने कुऱ्हाड या हत्याराने सहाय्याने केला होता. त्या प्रकरणी पोलिसांच्या पथकाने हनुमंत पाटील यास ताब्यात घेतले असून त्याच्यावर तिघांचा खून केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. त्याने खुनाची कबुली दिल्यानंतर बोरगाव तसेच पोशीर आणि माले या गावातील ग्रामस्थ नेरळ पोलीस ठाण्यात पोहचले.

बोरगाव येथील स्थानिक ग्रामस्थ तसेच मामाचे गाव असलेले पोशीर तसेच मदन पाटील यांच्या पत्नीचे माहेर असलेले माले या गावातील रहिवाशी नेरळ पोलीस ठाणे येथे एकत्र आले होते. त्यावेळी या ग्रामस्थांनी नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांना निवेदन सादर केले. त्या निवेदनात आरोपी हनुमंत पाटील यास फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी केली.

या हत्याकांडमध्ये आरोपीचे आणखी कोणी साथीदार आहेत काय? याचा शोध पोलिसांनी घ्यावा अशी विनंती करण्यात आली आहे. तेथे जमलेले ग्रामस्थ आणि नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार एकावेळी तिघांची हत्या एक व्यक्ती करू शकतो काय? असा प्रश्न उपस्थित केला आहे तर सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा होईल याकडे पोलिसांचे लक्ष असणार आहे.

या प्रकरणाची चौकशी उपविभागीय अधिकारी डी. डी. टेळे यांच्याकडून सुरू आहे. पुराव्या शोधण्यासाठी आमचे पोलीस सक्रियपणे काम करत आहेत, अशी माहिती देवून पोलीस पोलिसांचे काम चोखपणे पार पाडत आहेत. अशी माहिती दिली. त्यावेळी तेथे तीन गावातील ग्रामस्थ तसेच आजूबाजूच्या गावातील नातेवाईकदेखील उपस्थित होते.

# टिटवी ग्रामस्थांचा शिवसेनेत पक्षप्रवेश

## * आमदार महेंद्र दळवी यांनी केले स्वागत



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील सारसोली ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या टिटवी ग्रामस्थांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांचे स्वागत केले.

अलिबाग राजमळा येथील आमदार महेंद्र दळवी यांचे निवासस्थानी टिटवी ग्रामस्थांचा शिवसेना पक्ष प्रवेश कार्यक्रम झाला. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर शिवसेनेचे मुरुड तालुका ज्येष्ठ नेते सी.एम.ठाकूर, शिवसेना युवा नेते दिनेश मिनमिने, शिघ्रे ग्रामपंचायत सदस्य जनार्दन मांदारकर आदीची उपस्थिती या वेळी होती.

टिटवी येथील माजी सरपंच चंद्रकांत झोरे, यशवंत झोरे, दामु झोरे, बाबू ढेबे, शांताराम बावदाने, धोंडू झोरे, भगवान झोरे, चंदर झोरे, कमळाकर झोरे, यांनी शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश केला.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी टिटवी ग्रामस्थांचे शिवसेनेत स्वागत केले व भगवी शाल प्रदान केली. टिटवी ग्रामस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी मनोगतात व्यक्त केले.

# खालापूरात चोरीच्या दोन घटना; पावणेनऊ लाखांचा ऐवज चोरीला

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली तालुक्यात दोन वेगवेगळ्या चोरीच्या घटनांमध्ये जवळपास आठ लाख ७६ हजार ५०० रुपये ऐवज चोरीला गेला आहे.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीची घटना घडली आहे. सोमवारी पहाटे लोधीवली येथील रिलायन्स टाउनशिपमधील रुम नं. ७२ बी या ठिकाणी, खालापुर येथे कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराचे कडीकोयंडा तोडून बेडरुममधील लोखंडी कपाटातील सात लाख २६ हजार ६०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेले आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष मोरे हे करीत आहेत.

दुसरी घटना खोपोली पोलीस ठाणे हद्दीत घडली. सोमवारी संध्याकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास खोपोली येथील आशियाना पॅराडाईज या बिल्डींगचे समोरील रोडवरुन पायी चालत जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील एक लाख ५० हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने दुचाकीवरून आलेल्या दोघांनी जबरीने खेचून निघून गेले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात दोन चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई अभिजित व्हरांबळे हे करीत आहेत.


**चौक : मोर्बे येथील प्रथमेश दिनकर राणे यांच्या निवासस्थानी विराजमान आकर्षक श्रीगणेश मुर्ती.**


**माणगाव : तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच ॲड. विलास गोठल यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेले गणराय.**


**माणगाव : तालुक्यातील तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत महादेव रोडे यांच्या निवासस्थानी विराजमान असलेले गणराय.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक / कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांकडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा स्विकारुन लेखी खरेदी खत करणार आहेत. सदर मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उमरोली, ता. पनवेल, जि. रायगड.**

| मालक/ कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. /हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. |
|---|---|---|---|
| श्री. धर्मा गजानन डांगरकर | १०/१/अ | ०–१६–१० पो.ख. ०–०१–३० एकुण ०–१७–४० | ०३–०६ |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १२/०९/२०२४**

**सही/–**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**
**(ॲडव्होकेट)**
**पत्ता : डी–३/१, किनारा हौ.सो.,**
**५२ बंगला, पनवेल ४१०२०६,**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. नं. ९८२०७९५६०५**

# कर्जत तालुक्यात २६०९ गौरींचे पूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गौरी गणपती सणाला फार महत्त्व आहे. यंदा कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३४६, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२५२, माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ अशा २६०९ गौरींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

गणेश चतुर्थीला श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. कुणी दीड दिवसांनी, कुणी पाच दिवसांनी, कुणी गौरींबरोबर, कुणी वामन नवमी तर कुणी अनंत चातुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जन करतात, मात्र गौरींचे आगमन एकाच वेळी होते. कुणी मूर्तीची गौर पूजतात तर कुणी आदल्या दिवशी पहाटेच रानात जाऊन गौरी पूजनाच्या पूर्व संध्ये पर्यंत कचोऱ्याची फुले (गौरीची फुले) व तेरड्याच्या फुलांसकटच्या फांद्या आणतात. त्यानंतर महिला रात्रभर गाणी गात गौर सजवण्यात गुंततात साडी नेसवून गौर सजवून त्यावर मुखवटा आणि पुठ्ठ्याचे हात लाऊन खुर्चीवर गौर बसवितात. कुणाच्या उभ्या गौरी तर कुणाच्या नाचऱ्या गौरी असतात. त्यांचे पूजन मात्र सारख्याच पद्धतीचे असते.

दुपारी गौरीचे पूजन झाल्यावर घरातील सुवासिनी नटून थाटून सुपामध्ये पूजेचे साहित्य घेऊन गौरीचा ओवसा घेतला. विशेष म्हणजे नववधूने हा ओवसा घेतलाच पाहिजे असे परंपरेनुसार ठरलेले आहे. या वेळी त्यांनी उकडलेल्या पिठांचे दिवे लाऊन गौरींना ओवाळले.

या सोहळ्याचा आनंद बहुतांश घरातील सुवासिनींनी घेतला. बऱ्याच ठिकाणी केवळ गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. गौर आणली जात नाही. काहींची गौर एकच असते अशा ठिकाणी सारे कुटुंबीय गौराई असलेल्या मोठ्या घरी एकत्रित झाले आणि गौरी पुजन करून ओवासा घेऊन आनंद लुटला.



# मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत रोशनी पारधीचे शतक

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसीएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पंधरा वर्षांखालील मुलींच्या आंतरजिल्हा निमंत्रित निवडचाचणी एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील महाडच्या रोशनी पारधी हिने हिंगोली संघा विरूद्ध खेळताना दमदार शतक ठोकले आहे.

अवघा ७८ चेंडूंचा सामना करत २४ चौकार आणि २ षटकार खेचत तिने नाबाद १३६ धावा केल्या,रायगड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १९ षटकांनमध्ये एक गडी गमावत २०२ धावा धावफलकावर नोंदवल्या, सलामीला आलेल्या कर्णधार रोशनी पारधी व स्नेहल पवार यांनी धुवांधार फलंदाजी करत पहिल्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली,स्नेहल पवार हिने १४ धावा काढत रोशनीला जास्तीत जास्त फलंदाजी करण्यास दिली. पहिल्या विकेट नंतर अनिश्का वर्मा हिने दुसऱ्या बाजूने रोशनीला साथ देत नाबाद २४ धावा काढल्या.१९ व्या षटकाच्या समाप्ती नंतर पावसाने हजेरी लावली व त्यानंत सामना अनिर्णीत घोषित करण्यात आला.

रायगडच्या संघाने पहीच्याच साखळी सामन्यात दिमाखदार सुरुवात केली असल्याने जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक, सहसचिव बशीर चीचकर, रोशनी पारधीचे प्रशिक्षक आवेश चीचकर यांच्या सर्व पदाधिकारी, सदस्य खेळाडू यांनी रोशनीचे व सर्व संघाचे अभिनंदन केले आहे.


# पनवेल महानगरपालिका

## ई-निविदा सूचना
## विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब– १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदनीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/ विद्युत/ ३३/ २०२४ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' व 'ब' क्षेत्रामधील रस्त्यावरील पथदिवे (सिडको हस्तांतरीत पथदिवे वगळून) व प्रशासकीय कार्यालये, शाळा, फिश मार्केट, स्मशानभुमी, पाण्याची टाकी, भाजी मार्केट, आंबेडकर भवन, आरोग्य केंद्रे, रुग्णालये, पादचारी उन्नत मार्ग (FOB) व इतर इमारती इत्यादी ठिकाणांच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षाकरीता निगा, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे. | रु.७,१७,१३,६०८/– | रु.२,८२,७१७/– | रु. ३,५४०/– |
| २. | पमपा/ विद्युत/ ३४/ २०२४ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'क' व 'ड' क्षेत्रामधील रस्त्यावरील पथदिवे (सिडको हस्तांतरीत पथदिवे वगळून) व प्रशासकीय कार्यालये, शाळा, फिश मार्केट, स्मशानभुमी, पाण्याची टाकी, भाजी मार्केट, आंबेडकर भवन, आरोग्य केंद्रे, रुग्णालये, पादचारी उन्नत मार्ग (FOB) व इतर इमारती इत्यादी ठिकाणांच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षाकरीता निगा, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे, | रु. ७,५३,८२,३०९/– | रु. २,९७,९१७/– | रु. ३,५४०/– |
| ३. | पमपा/ विद्युत/ ३२/ २०२४ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या अस्तित्वात असलेल्या सिग्नल व्यवस्थेची दोन वर्ष कालावधीकरीता साहित्याचा पुरवठा करुन दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे. | रु.१,१९,०१,१४५/– | रु. १,१९,०००/– | रु. १,१८०/– |
| ४. | पमपा विद्युत /३५/ २०२४ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' खारघर क्षेत्रातील उत्सव चौकामध्ये डेकोरेटीव्ह लाईट स्थापित करुन कार्यान्वित करणे. | रु.७,७७,७९८/– | रु. ७,७८०/– | रु. ५९०/– |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पर्नेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.४४१/४४२/२०२४**
**दिनांक–११/०९/२०२४**

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**



उरण : भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, बिंदू गावंड यांच्या पिरकोन येथील निवासस्थानी विराजमान गणराय.



उरण : पूर्व विभागाचे भाजप युवा अध्यक्ष प्रवीण बाळकृष्ण घासे यांच्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी उरण पूर्व विभागीय अध्यक्ष शशी भाई पाटील, उद्योगपती देवेंद्र पाटील,आवरेचे धनेश गावंड, सारडेचे सरपंच रोशन पाटील, भाजप कार्यकर्ते अजित पाटील, खोपटेचे समीर पाटील, मोठी जुईचे भाजप कार्यकर्ते हरिश्चंद्र पाटील, रोशन पाटील आदी मित्र परिवार उपस्थित होता.



सचिन काईनकर, गुळसुंदे, पनवेल



उरण : नीता महेश बालदी यांनी उरण महिला सदस्य बिंदू मुकुंद गावंड यांच्या घरातील बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी पिरकोन माजी सरपंच भागाबाई गावंड, माजी उपसरपंच राजश्री म्हात्रे, श्री. गणेश महिला मंडळ अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सदस्य शारदा गावंड, ग्रामपंचायत सदस्य अनिता गावंड, अक्षता गावंड, दिव्या गावंड, हर्षित गावंड आदी उपस्थित होत्या.



सुरेश भोसले आणि कुटुंबीय, सुकापूर, पनवेल



पनवेल : कराडे खुर्द ग्रामपंचायत सदस्य योगेश्री योगेश मुरकुटे यांच्या घरातील बाप्पा.



कराडे बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य शेखर जाधव यांच्या घरातील गणपती व गौरी



रवींद्र पाटील, कोंडले, पनवेल



बाळूशेठ पाटील, तारा, पनवेल



जय शिवराय युवक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कामठा, उरण



भाजप पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, तारा, पनवेल



राजे शिवाजी मित्र मंडळ, बुरुड आळी, उरण कोट नाका




लीला शंकर वाडकर, नवीन पनवेल



सरपंच रोशन पाटील, सारडे, उरण



तेजस देवघरे, इसांबे, खालापूर



शैलेश पोतदार, बाजार पेठ उरण



पनवेल : कानपोली येथील बालाजी रेसिडेन्सी बिल्डिंगमध्ये मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



विशाल म्हात्रे, तारा, पनवेल



नाथा भाई भरवाड, गवलीवाडा, करंजाडे



संदेश मालकर, तलवली, खालापूर



निखील पाटील, लोधीवली



संतोष पारधी, सांगुर्ली, पनवेल



पनवेल : तालुक्यातील शिवकरचे सरपंच आनंद ढवळे यांच्या घरातील बाप्पा.



प्रतिक शरद खालापूरकर, रोहिदास वाडा, पनवेल



बाळकृष्ण पदू माळी, वावेघर, रसायनी

# मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थिनींनी सादर केलेला प्रकल्प ठरला टॉप प्रोजेक्ट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

समुद्रातील जीव सुरक्षित राहून पर्यावरणाचा समतोल राखला जावा यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थिनींनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आविष्कार केला आहे. या प्रकल्पाचे नुकतेच बंगळुरूमध्ये आयोजित चेंजमेकर्स ऑफ टुमारो ग्लोबल इव्हेंटमध्ये सादरीकरण करण्यात आले.



शेल एनएक्सप्लोरर्सच्या वतीने बंगळुरू येथे चेंजमेकर्स ऑफ टुमारो ग्लोबल इव्हेंटचे आयोजन करण्यात आले होते. शाश्वत भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी पुढच्या पिढीला एकत्र आणणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करीत मॉडर्न स्कूलच्या नववी इयत्तेत शिकणाऱ्या प्रांजल उमेश भिलारे, अनुष्का पंचाळ या दोन विद्यार्थिनींनी बायो ब्लूम इन्व्हेस्टिगेटर प्रकल्पाची प्रतिकृती सादर केली. यामुळे केवळ शाळेचीच नव्हे, तर संस्था आणि राज्याचीही मान उंचावली गेली आहे.

या उपक्रमात महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे तीन लाखाहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.यामध्ये एन एक्स शार्क तर्फे मॉडर्न स्कुल तर्फे सादर केलेल्या प्रतिकृतीची टॉप प्रोजेक्ट म्हणून निवड केली. त्याचप्रमाणे विजेत्यांना विद्यालयामध्ये रोबोटीक लॅब तयार करण्यासाठी निधी प्रदान करण्यात आला.

बेंगळुरु येथे पार पडलेल्या Shell's Changemakers of Tomorrow कार्यक्रमाचे उद्घाटन कर्नाटक सरकारचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मंत्री मधु बंगारप्पा यांच्या हस्ते झाले. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमास मुख्य तज्ञ, उद्योगातील नेते आणि नवोदितांना सहभागी झाले होते.

# खारघरमध्ये नवा पूल वाहतुकीसाठी खुला

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी दुसरे प्रवेशद्वार गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर वाहनांसाठी खुले करण्यात आले.

यासाठी सिडको मंडळाने सुमारे एक कोटी रुपये खर्च केला असून यामुळे शीव-पनवेल महामार्गावरुन थेट कोपरा पुलावरून खारघर वसाहतीमध्ये वाहनांना शिरता येईल. यापूर्वीचा या ठिकाणचा पूल हा हलक्या वाहनांसाठी होता. येथे नवीन रुंद पूल बांधण्याची मागणी वाहनाचालकांकडून केली जात होती. खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यावेळी तात्पुरत्या स्वरुपात हा पूल कोपरा गावाजवळ बांधला होता, मात्र कायमस्वरूपी पूल बांधावा अशी मागणी नागरिकांकडून केल्यानंतर सिडको मंडळाने २२ मीटर रुंदीचा आणि साडेसात मीटर लांबीचा पूल खाडी पात्रावर उभारला.

या पुलावरून अवजड वाहतूक टाळण्यासाठी हाईटगेट लावणार आहे. यामुळे विनाअडथळा सेक्टर १२ ते सेक्टर ३५ पर्यंत जाणार्या या मार्गावरील प्रवास वेगाने होणार आहे.

# पनवेल प्रारूप विकास आराखड्यावर सुमारे सहा हजार हरकती आणि सूचना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्याबाबत सूचना व हरकतींसाठी ७ सप्टेंबर ही अंतिम तारीख जाहीर असल्याने शेवटच्या दिवसापर्यंत सहा हजार ३९३ हरकती व सूचना पालिका प्रशासनाकडे आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

प्रारूप विकास आराखड्याविषयी हरकती नोंदविण्याची जमीन मालकांची वेळ संपली. काही राजकीय पक्षांनी हरकतींसाठी आणखी महिनाभराची अंतिम वेळ वाढविण्याची मागणी केली होती, परंतु पालिका अधिनियमामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार पाच लाख लोकवस्तीची पालिका असल्याने ३० दिवसांपेक्षा अधिक मुदतवाढीची तरतूद नसल्याने ही मागणी मान्य पूर्ण होऊ शकली नाही.

पनवेलच्या प्रारूप विकास आराखड्यात शेतजमिनींच्या मालकांना विकासक बनविण्याची संधी मिळाली असल्याने सुरुवातीला १५ दिवस पालिकेच्या नगर रचना विभागाकडे हरकती व सूचना कमी प्रमाणात प्राप्त झाल्या. लवकरच या सर्व हरकती व सूचना वेगवेगळ्या केल्यानंतर पालिकेने विकास आराखड्यात स्थापन केलेली समिती त्या हरकतींवर सुनावणी घेणार आहे.

**ज्या हरकतींवर खरेच सुधारणा करता येतील किंवा आराखड्याविषयी काही सकारात्मक सूचना असल्यास त्यावर समिती नक्की गांभीर्याने विचार करेल.**

**-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल मनपा**

# समाजाभिमुख कामे करण्याची भूमिका - खासदार सुनील तटकरे

## वाशी हद्दीत विविध कामांचे उद्घाटन व भूमिपूजन

**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव विभागात मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, मंदिरे, समाजमंदिर आदी कामे या विभागात झाली आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून एमआयडीसीकडून विकासकामे या विभागात होत आहेत. समाजाभिमुख प्रामाणिकपणे कामे करण्याची भूमिका आम्ही घेतली आहे. त्यामुळे यापुढेही विकासकामे सुरूच राहतील, असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले.



रोहा तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतीच्या वतीने विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आले. त्या वेळी खासदार सुनील तटकरे बोलत होते.

कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, उपाध्यक्ष शंकरराव भगत, ज्ञानेश्वर साळुंखे, प्रदिप बामुगडे, जयवंत मुंढे, अनंत मगर, अनंत थिटे, सरपंच वारगुडे, उपसरपंच अरविंद मगर, सचिन कदम, रामाशेठ म्हात्रे, उत्तम नाईक, नवनीत डोलकर, सतिष भगत, महेश बामुगडे, शशीकांत कडू, दिनेश रटाटे, महेश तुपकर, अतोंष शिर्के, हरिश्चंद्र मोरे, विनायक कदम, गणेश भगत, संदिप मगर आदी उपस्थित होते.



खासदार तटकरे पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यभरात महिला सक्षमीकरण सुरू आहे. आज मुलींसाठी आठ लाख उत्पन्न असलेल्यांचा पुढील शैक्षणिक खर्च राज्य सरकार करणार आहे. सोन्याचा चमचा घेऊन आलेल्यांना १५०० रुपयांची किंमत कळणार नाही. मी तीन वेळा पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. माझ्या आग्रहाखातर आठ लाख लोकांना रोजगार मिळेल, असा ४० कोटींचा दिघी बंदरसाठी निधी उपलब्ध झाला आहे, असे मत व्यक्त केले आहे.

सुरेश मगर यांनी, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात झंझावात सुरू असून महिलांसाठी राबवित असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरात पैसे पोहचले आहेत. खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून वाशी ग्रामपंचायतीमधील वाशी, बोरघर, लांडर, महादेववाडी या गावांतील विकासकामासाठी १४ कोटींचा निधी दिला आहे. महादेव मंदिर जिर्णोद्धारासाठी दोन कोटी ४० लाख रूपयांचा निधी पहिला टप्प्यात देण्यात आला. कुणबी समाजाच्या सभागृह अडीच कोटींचा निधी मंजूर करण्यात आले असल्याचे सांगितले. हे संपूर्ण श्रेय खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांना जात असल्याचे ते म्हणाले.

आपल्या प्रास्ताविकात अरविंद मगर यांनी, खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून या विभागात विकासकामे करण्यात आली आहेत. मंदिराच्या कामासाठी निधीरुपी सहकार्य करावे, अशी मागणी या वेळी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप मगर यांनी केले.

# रायगडात घरोघरी गौराईचे पूजन



**अलिबाग : प्रतिनिधी**

तीन दिवसांपूर्वी घरोघरी गणेशाचे आगमन झाले. त्यानंतर मंगळवारी तीन दिवसांची पाहुणी असलेल्या गौराईंचे घरोघरी आगमन झाले. जिल्ह्यात १५ हजार ८३२ गौराईंचे आगमन झाले. गौरींच्या आगमनामुळे महिलावर्गांत उत्साहाचे वातावरण असून यासणासाठी महिला मोठ्या संख्येने माहेरी आल्या आहेत.

कोकणात गणेशोत्सवाचा उत्साह टीपेला पोहचला आहे. दुपारनंतर मुली आणि महिला गौरी आणण्यासाठी गेल्या. कोकणात तेरड्याच्या गौरी आणल्या जातात. परंपरेनुसार



माळरानावरून तेरड्याच्या गौरींचे घरोघरी वाजतगाजत आणण्यात आल्या. त्यानंतर गौरी सजवण्यात आल्या. वस्त्रालंकारांचा साजश्रृंगार चढवण्यात आला. भेंडीच्या फुलांनी पूजा करण्यात आली. महिलांनी गौराईची सामुहिक आरती केली. आवडता भाजी–भाकरीचा नैवेद्य दाखवण्यात आला. रात्री जेवणानंतर गौरीचे स्तवन झाले. महिलांची नाचगाणी फुगड्या आदी खेळांना रंगत आली. गौरींचे विसर्जन गुरुवारी (दि.१२) केले जाणार आहे.

# मुरूड शहरात गौरीमातेचे आनंदाने पूजन



**मुरूड : रामप्रहर वृत्त**

गौरीपूजन हा महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या सणांपैकी एक सण आहे. राजपुरी येथे सुपात पूजनाचे साहित्य घेऊन वाजत–गाजत गावातील गौरी पूजनाचा कार्यक्रम झाला.

भारतीय संस्कृती, परंपरांमध्ये तसेच समाजजीवनात गौरी हे शिवाच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप मानले गेले आहे. अनेक ठिकाणी याला महालक्ष्मी पूजन असेही संबोधले जाते.गौरोईचा ओवसा माहेवाशीण पुजते. मुरूड शहरासह पंचक्रोशी भागात तेरड्याची गौर बघायला मिळते. भाद्रपद सप्तमीच्या दिवशी सायंकाळी महिला तेरड्याची रोपे मुळासकट काढून आणतात. गौरी इल्यो असे म्हणत त्यांचे स्वागत केले जाते. तेरड्याची मुळे म्हणजेच लक्ष्मीची पावले मानली जातात. दुसऱ्या दिवशी म्हणजेच अष्टमीला महापूजा व नवमीला वाजत–गाजत मिरवणुकीने गौरी विसर्जन केले जाते.

# आत्म्याचे दर्शन देणारे ज्ञान म्हणजे अध्यात्म –प्रवचनकार अशोक पाटील

**खोपोली : प्रतिनिधी**

अध्यात्म म्हणजे काय? मी कोण आहे? जीवनात आपले कर्तव्य काय असते? अशा मूलभूत प्रश्नांचा शोध घेण्यासाठी सर्वप्रथम आपल्याला आत्म्याचा व आपल्या देहाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. आपल्यातल्या आत्म्याचे दर्शन आपल्याला घडते आणि हेच खरे अध्यात्मज्ञान होय, असे प्रतिपादन प्रवचनकार आत्मानंद संस्थेचे प्रमुख अशोक पाटील यांनी केले.

कोमसाप खोपोलीच्या सर्व सदस्यांशी अध्यात्माची संकल्पना या विषयावर संवाद साधताना ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी खोपोली शाखेच्या अध्यक्ष कवयित्री उज्ज्वला दिघे होत्या.

कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे अशोक पाटील यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. खोपोली शाखेचे सदस्य व केएमसी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. गणपती पांडुरंग मुळीक यांना मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. अध्यक्षा उज्वला दिघे यांनी प्रास्ताविक केले. नरेंद्र हर्डीकर यांनी परिचय करून दिला. प्रकाश राजोपाध्ये यांनी सर्वांचे आभार मानले.

# मुरुडमधील ठाकरे गटातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील गणेश आळीमधील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातील कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्चास ठेवत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

गणेश आळीमधील स्वप्नील चौलकर, प्रतीक चौलकर, ओमकार गुरव, संतोष चौलकर, विक्रांत मसाल, राहुल माळी आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शहराच्या विकासासाठी आमदार महेंद्र दळवी यांनी

कोट्यवधींचा निधी उपलब्ध केल्याने मुरूड शहराचा सर्वांगीण विकास आज पहावयास मिळत आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीवर खुश होत आम्ही सर्वजण शिवसेनेत प्रवेश करीत असल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले.


आमदार दळवी यांनी सर्वांचे स्वागत केले आहे. या वेळी त्यांनी सांगितले की, शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणखीन पाच कोटी रुपयांचा निधी आणला असून या पैशातून विविध विकासकामे पूर्ण होणार आहेत. लोकांनी विकास करणाऱ्या पाठीमागे भक्कम ताकद उभी करून दुसऱ्यांदा जनतेमधून निवडून येण्याची मला संधी द्यावी, असे आवाहन केले.

या वेळी शिवसेनेचे मुरूड शहर प्रमुख संदीप पाटील, उप शहर प्रमुख वीरेंद्र भगत, योगेश ठाकूर, युवा सेना शहरप्रमुख ओम पाटील, महेश पाटील, विजय भगत, विशाल शिंपी आदी उपस्थित होते.

# निवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांचे जंगी स्वागत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

देशसेवेतून निवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांची साखर ग्रामस्थांकडून ओपन जीपमधून पितळवाडी फाट्यापासून सपत्नीक मिरवणूक अन् साखर गावी सत्कार करण्यात आला.



## मिरवणूक काढून ग्रामस्थांकडून सत्कार

बेळगाव येथे ६ मराठा लाईट इन्फ्रंट्रीमध्ये भारतीय सैन्यदलात भरती होऊन २२ वर्षांनंतर सेवानिवृत्त होऊन सैनिक पंढरीनाथ मालुसरे हे सहकुटूंब गावी परतले. या वेळी पितळवाडी नाक्यावर चालक मालक संघटनेच्या वतीने पंढरीनाथ मालुसरे यांचे स्वागत लक्ष्मण महाराज खेडेकर, जनतादल सेक्युलरचे रायगड जिल्हाध्यक्ष भगवान साळवी, सचिन खेडेकर, शिवाजी मालुसरे, श्याम वरणकर, ज्ञानोबा कुंभार, स्वप्नील कुंभार, संदीप वरणकर, पंढरीनाथ जाधव, तुकाराम गायकवाड, विलास जाधव, लक्ष्मण केसरकर, मिलिंद मालुसरे, राजू गायकवाड, विनायक केसरकर, दिपक पार्टे, संजय चोरगे, संतोष खेडेकर, भाऊ तुडीलकर आदींच्या उपस्थित करण्यात आले.

मिरवणूक साखरगावच्या ग्रामदैवतांच्या मंदिराजवळ आल्यानंतर सेवानिवृत्त जवान मालुसरे यांनी सहकुटूंब येऊन मनोभावे दर्शन घेतले.

यानंतर एका छोट्या शामियान्यामध्ये पंढरीनाथ मालुसरे यांचा साखर ग्रामस्थांतर्फे सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. शिवसेना तालुकाप्रमुख अनिल मालुसरे यांनी, तालुक्यातील प्रत्येक सैनिकाला सन्मान मिळावा अशी भावना आहे, असे मत मांडले.

याप्रसंगी देशसेवेतून निवृत्त सैनिक पंढरीनाथ मालुसरे यांचा सत्कार स्वराज्य युवा प्रतिष्ठानतर्फे तसेच माजी सैनिक नायब सुभेदार सुनील चोरगे, प्रदीप मालुसरे, उमरठचे कळंबे व माजी सैनिक रामदास कळंबे, महादेव चोरगे, कृष्णा चोरगे यांच्यातर्फे करण्यात आला.

# मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्टफोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे/प्रमाणपत्र इ.,अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबरपर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

**गणेश दर्शन**



राजू मोरे, मोर्बा, माणगाव



शंकर बाळकृष्ण दाखिनकर, मोकाशीवाडी, माणगाव



कामगार नेते संजय काकडे, माणगाव



उलवे : येथील सेक्टर १७मध्ये हनुमान मंदिर समितीतर्फे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी हनुमान मंदिर अध्यक्ष अवधेशकुमार महतो, वहाळचे माजी उपसरपंच अमर महात्रे, अमित नायक, शैलेश भगत, सुनील मोर्या, मनोज मोर्या, अवनीश सिंग, गुलाब सिंग, भरत गुप्ता, अभिमन्यु दापोळकर, मंजूळ शुक्ला, देबोलय मित्रा, अखिलेश विश्वकर्मा आदींनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला.

















पनवेल : भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यात ठिकठिकाणी विराजमान झालेल्या गणेशाचे मनोभावे दर्शन घेतले. यामध्ये त्यांनी नवीन पनवेलमध्ये डॉ. शिकवले, रमेश देशमुख, मयुर कदम, तक्का येथे अजय बहिरा, तक्का गाव येथे प्रभाकर बहिरा, शेलघर येथे कामगार नेते महेंद्र घरत, वारदोली बेलवली येथे ग्रामपंचायत सदस्य हेमंत तांडेल व जितेंद्र बताले, लोणीवली येथे सतीश मालुसरे, पाली येथे संतोष शेळके व चाऊशेठ म्हात्रे, पालीचा पाडा महेंद्र भोईर, शिवकर येथे आनंद ढवळे तसेच अबू ठाकूर यांच्याकडे, वडघर येथे संजय कोहली, करंजाडे येथे सरपंच मंगेश शेलार यांच्याकडे भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी उपस्थित होते.



















खालापूर : भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी यांनी खरवली येथील भरत महाडिक यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष सन्नी यादव, प्रसाद पाटील आदी उपस्थित होते.







पनवेल : भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी यांनी ओवे कॅम्प परिसरात विविध गणरायांचे दर्शन घेतले.



पाली : शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई यांच्या पाली येथील निवासस्थानी विराजमान गणराय.



पनवेल : गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या कोपर येथील निवासस्थानी स्थानापन्न गणरायाचे युवा सेना महाराष्ट्र राज्य सचिव तथा उरण विधानसभा निरीक्षक रुपेश पाटील आणि शिवसेना उरण विधानसभा प्रमुख मनोज घरत यांनी दर्शन घेतले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com